यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई–मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479

परीक्षा विभाग / Examination Division

जा. क्र : पनिका/ 2026/2138

परिपत्रक क्र. 129/2026

दिनांक :02/11/2026

पदवी व पदव्युत्तर पदवी (UG/PG) शिक्षणक्रमांच्या नियमित विद्यार्थ्यांसाठी गृहपाठ ऑनलाईन (Home Assignment) पद्धतीने सादर करणेबाबत महत्वाच्या सूचना

विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षांचे आयोजन डिसेंबर 2026 / जानेवारी 2027 मध्ये करावयाचे नियोजित आहे. त्या अनुषंगाने पदवी व पदव्युत्तर पदवी (UG/PG) शिक्षणक्रमांच्या नियमित / पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी गृहपाठ (Home Assignment) ऑनलाईन पद्धतीने सादर करावयाचे आहेत.

माहे मे 2025 मध्ये अंतिम परीक्षेतील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) अंतर्गत येणाऱ्या पदव्युत्तर पदवी (PG) तसेच पदवी / पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांकरिता Online Home Assignment कार्यपद्धती लागू करण्यात आली होती.

याचाच पुढील टप्पा म्हणून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून विद्यार्थ्यांचे गृहपाठ (Home Assignment) ऑनलाईन पद्धतीने सादर करून घेतले जात आहेत.

शैक्षणिक वर्ष 2026-27 मधील जानेवारी 2026 व जुलै 2026 या दोन्ही सत्रांतील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन गृहपाठांबाबत महत्वाची माहिती सर्व विभागीय केंद्रे, अभ्यासकेंद्रे आणि विद्यार्थी यांना या परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे कळविण्यांत येत आहे.

<table>
<tr><th>शै.वर्ष/ सत्र</th><th colspan="3">Details For January 2027 Exam Event</th></tr>
<tr><th>सत्र/Session</th><th>UG/ पदवी सत्र</th><th>PG / पदव्युत्तर पदवी सत्र</th><th>Annual/ वार्षिक शिक्षणक्रम</th></tr>
<tr><td rowspan="2">Jan 2025 सत्र (PRN Start from 2501..)

Jan 2026 सत्र (PRN Start from 2601..)</td><td rowspan="2">Fresher – IV Semester
Repeater – I, II, III, Semester

Fresher – II Semester
Repeater – I, Semester</td><td>Fresher - II, IV Semester
Repeater - I, III Semester</td><td>(F.Y., S.Y. Fresher Student Only- January 2026 Batch)</td></tr>
<tr><td>NEP 2020 अंतर्गत सर्व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या सर्व सत्रांचे नियमित व पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी यांनी ऑपलाईन पध्दतीने गृहपाठ अपलोड करावेत.</td><td>जानेवारी 2026 या सत्रात प्रवेश घेतलेल्या G01,G02,G12,G15,M86,M87,M88,M90 या वार्षिक शिक्षणक्रमांच्या प्रथम, द्वितीय वर्षाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने गृहपाठ अपलोड करावेत.</td></tr>
<tr><td rowspan="2">July 2026 सत्र (PRN 2607..)

OA 2026-27 (PRN 20..)</td><td rowspan="2">Fresher – I,III,V Semester
Repeater-I,II,III,IV,V,VI Semester
या शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या इतर पदवी शिक्षणक्रमाचे विद्यार्थी यांनी ऑपलाईन पध्दतीने गृहपाठ अपलोड करावेत.</td><td rowspan="2">Fresher- I,III Semester
Repeater I,II,III,IV Semester
NEP2020 अंतर्गत सर्व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या सर्व सत्रांचे नियमित व पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी यांनी ऑनलाईन पध्दतीने गृहपाठ अपलोड करावेत.</td><td>M88,M90 या वार्षिक शिक्षणक्रमांच्या पुनर्परिक्षार्थी ऑनलाईन पध्दतीने गृहपाठ अपलोड करावेत</td></tr>
<tr><td>जुलै 2026 मध्ये वार्षिक शिक्षणक्रमांना ज्या विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षास प्रवेश घेतला आहे. अशा विद्यार्थ्यांना मे 2027 परीक्षेला ऑनलाईन गृहपाठ सादर करावयाचे आहे. याबाबत सविस्तर सुचना कळविण्यात येतील.</td></tr>
<tr><td colspan="4">टीप : पुनर्परीक्षार्थी अभ्यासक्रमामध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी गृहपाठ (Home Assignment) हे पुन्हा सादर करावे असे माहितीपुस्तिका किंवा अभ्यासक्रमामध्ये नमूद असेल त्यांनाच लागू राहील.</td></tr>
<tr><td colspan="4">सोबत दिलेल्या यादीतील शिक्षणक्रमांचेच गृहपाठ ऑनलाईन पद्धतीने अपलोड करावयाचे आहेत. तसेच सदर यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे.</td></tr>
</table>

अधिक माहितीसाठी **https://asm.ycmou.org.in/** या संकेतस्थळावरील Home Page वरील Notification मध्ये **List of Courses enabled for submission of Assignments Online** या टॅबला भेट द्यावी. **त्यात दिलेल्या यादीतील शिक्षणक्रमांचेच गृहपाठ ऑनलाईन पद्धतीने अपलोड करावयाचे आहेत.** ऑनलाईन गृहपाठ वेळापत्रक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सादर करण्यासाठी व अभ्यासकेंद्रांना गृहपाठ तपासण्यासाठी कालावधी	
विद्यार्थ्यांनी गृहपाठ अपलोड करणे.	**दिनांक - 15/12/2026**
विद्यार्थ्यांनी अपलोड केलेले गृहपाठ अभ्यासकेंद्रांनी पडताळणी करणे.	**दिनांक - 18/12/2026**
समंत्रकांनी गृहपाठ तपासणी करणे.	**दिनांक - 28/12/2026**

वरील वेळापत्रकानुसार सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की त्यांनी होम असाईनमेंटच्या **https://asm.ycmou.org.in/** या संकेतस्थळाला भेट देऊन आपल्या शिक्षणक्रमाची नोंद तेथे तपासावी. तसेच, अभ्यासकेंद्रांनीही विद्यार्थ्यांना सूचित करावयाचे आहे आणि अपलोड केलेल्या गृहपाठांचे व्हेरिफिकेशन आपल्या अभ्यास केंद्राच्या लॉगीनमधून त्वरित पूर्ण करायवाचे आहे. प्रत्येक अभ्यासकेंद्रांने केंद्रावरील संमत्रंकाची माहिती भरून त्यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने वरील मुदतीत गृहपाठ तपासून घेऊन ही कार्यवाही पूर्ण करावयाची आहे **(ऑनलाईन पद्धतीत समंत्रकांनी तपासलेल्या गृहपाठांचे गुण स्वयंचलित पद्धतीने संकेतस्थळावर नोंदविले जातात, त्यामुळे यांची पुनः संगणकीय नोंद करायची आवश्यकता नाही.) तसेच जे अभ्यासकेंद्र विद्यार्थ्यांचे गृहपाठ पडताळणी)Verification) व) Evaluation) गृहपाठ तपासण्याचे कामकाज विहित वेळेत पूर्ण न केल्यास अभ्यासकेंद्रांना विद्यापीठ परीक्षा मंडळाचा ठराव क्र.41.4.03 दि. 24 फेब्रुवारी 2022 नुसार दंड अदा करावा लागेल.याची गांभीर्याने नोंद घ्यावी .**

याबाबत विद्यार्थी, अभ्यासकेंद्र आणि संमंत्रक या सर्वांसाठी सविस्तर सूचना (यूजर गाईड) (https://asm.ycmou.org.in/) या लिंकवर दिलेल्या आहे तसेच कार्यपद्धती सोबत जोडली आहे.

दिलेल्या संकेतस्थळावर Home Page मधील Notification मध्ये दिलेल्या (**List of Courses enabled for submission of Assignments Online**) **यादीतील शिक्षणक्रमांव्यतिरिक्त इतर उर्वरित सर्व शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या प्रचलित कार्यपद्धतीनेच योग्य ती कार्यवाही करावयाची आहे. याची नोंद घ्यावी.**

कळावे.





(भटूप्रसाद पाटील)
परीक्षा नियंत्रक

सोबत :1. विद्यार्थी, अभ्यासकेंद्र आणि संमंत्रक यांच्यासाठी महत्वाच्या सूचना
2. शिक्षणक्रमनिहाय यादी

उचित कार्यवाहीसाठी –

1. **सर्व विभागीय केंद्रे -अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड**
   (आपल्या विभागीय केंद्राच्या अधिनस्त असलेल्या अभ्यासकेंद्रांना सूचित करून त्यांच्याद्वारे प्रवेशार्थी विद्यार्थ्यांपर्यंत वरीलप्रमाणे सूचनापत्रक पाठवावे आणि ऑनलाईन गृहपाठ पद्धतीबाबत अवगत करावे. **या शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रांची ऑनलाईन बैठक घेऊन त्याद्वारे त्यांना मार्गदर्शन करण्यात यावे.**
2. केंद्रप्रमुख व केंद्र संयोजक, य.च.म.मु विद्यापीठाचे पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाचे सर्व अभ्यासकेंद्र.

प्रत माहितीसाठी -

1. मा.कुलगुरू कार्यालय
2. मा.प्र-कुलगुरू कार्यालय
3. मा. संचालक, सर्व विद्याशाखा/मूल्यमापन विभाग
4. उपकुलसचिव, परीक्षा कक्ष 1 व 3,
5. प्रमुख, संगणक कक्ष (परीक्षा)
6. संयोजक, (प्रशासकीय) परीक्षा कक्ष-2
7. जनसंपर्क अधिकारी सदर परिपत्रक -वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धीकरिता.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479

परीक्षा विभाग / Examination Division

विद्यार्थी, अभ्यासकेंद्र आणि संमंत्रक यांच्यासाठी महत्वाच्या सूचना
ऑनलाईन गृहपाठ सादर करणे (Online Home Assignment Submission)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे आपण विद्यार्थी आहात. आपला प्रवेश कायम झाला असल्याने आपले अभिनंदन !

शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी हस्तलिखित गृहपाठ (Home Assignment) हे **ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या पोर्टलवर अपलोड करावयाचे आहेत. त्यानुसार https://asm.ycmou.org.in/**या संकेतस्थळावरील Home Page वरील Notification मध्ये **List of Courses enabled for submission of Assignments Online** दिलेल्या यादीतील शिक्षणक्रमांचेच गृहपाठ ऑनलाईन पद्धतीने अपलोड करण्यासाठी विहित वेळेत उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

तसेच बंद झालेल्या शिक्षणक्रमांसाठी द्वितीय वर्षास किंवा इतर वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षाच्या गृहपाठांच्याजुन्या प्रश्नपत्रिका वापरून गृहपाठ लिहावे. व पूर्वीच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे अभ्यासकेंद्रावर जमा करावे. (उदा. M17,M44,M51,M52,M53,M54,M82,,P90,V101,V102,V130,V136,V141,V142, V143, V144,)

- **विद्यार्थ्यांनी Online Home Assignment (गृहपाठ) सोडविण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

विद्यार्थ्यांनी गृहपाठ विहित मुदतीत संकेतस्थळावर अपलोड करावयाचे असून अभ्यासकेंद्रांनी ते अभ्यासकेंद्रांवरील समंत्रकांकडून ऑनलाईन पद्धतीने विहित मुदतीत तपासून पूर्ण करावयाचे आहेत. जे विद्यार्थी गृहपाठ अपलोड करणार नाहीत त्यांची अनुपस्थिती दर्शवून (AB दर्शवून) निकाल जाहीर केला जाईल, तसेच अभ्यासकेंद्रांनी समंत्रकांकडून ऑनलाईन पद्धतीने गृहपाठ तपासून घेणे आवश्यक आहे. विहित वेळेत जी अभ्यासकेंद्रे गृहपाठ तपासणीचे काम पूर्ण करू शकणार नाहीत अशा अभ्यासकेंद्रांवरील विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित अभ्यासकेंद्र आणि संबंधित समंत्रक जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

1. NEP2020 अंतर्गत पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमांच्या गृहपाठाच्या 30 गुणांच्या 4 Credit पॉईंट्ससाठी दोन्ही Assignments एकत्रित सोडवावयाच्या आहेत. **क्षेत्रीय कार्य हे गृहपाठांपेक्षा वेगळे कार्य असून त्यासाठी / Field Work साठी संबंधित विद्याशाखांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांप्रमाणे ऑफलाईन स्वरूपातील कार्यवाही करावी.**
2. **वार्षिक शिक्षणक्रमांच्या(उदा.G01,G02,G12) केवळ प्रथमवर्षाच्या विद्यार्थ्यांनी 20 गुणांचे गृहपाठ सोडवावयाचे आहेत. (G02 साठी माहितीपुस्तिकेतील निर्देशांनुसार 30 गुणांचे अंतर्गत मूल्यमापन आहे.)**
3. गृहपाठ अपलोड करण्यासाठी विद्यार्थ्यांनी **https://asm.ycmou.org.in/**या संकेतस्थळाला भेट द्यावी.येथे विद्यार्थ्यांना प्रथमतः नोंदणी करायची आहे. पोर्टलवर उपलब्ध असलेले Student User Guide सविस्तर वाचावे. ही सर्व प्रक्रिया एका विशिष्ट काल मर्यादेत पूर्ण करायची असल्यामुळे नेमून दिलेल्या कालावधीतच सर्व प्रक्रिया पूर्ण करावयाच्या आहेत (उदा. नोंदणी, अपलोडींग,रि-सबमिशन इ.) याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी आणि त्यानुसार तातडीन पूर्तता करावयाची आहे. **विहित कालावधीनंतर सॉफ्टवेअर लॉक होत असल्यामुळे गृहपाठ अपलोड करण्याची सुविधा विद्यापीठाकडून उपलब्ध होणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
4. विद्यार्थ्यांनी **https://asm.ycmou.org.in/** या संकेत स्थळावर नोंदणी करण्यासाठी आपल्या 16 अंकी PRN चा उपयोग करून तसेच, **युजर गाईड काळजीपूर्वक अभ्यासून** आपली नोंदणी करावी. विद्यार्थ्यांनी पोर्टलवर यशस्वीपणे लॉगीन केल्यावर विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती असलेली (प्रोफाईल) त्यांना दिसेल. हे प्रोफाईल पेज विषयनिहाय तयार केलेले आहे. प्रत्येक विषयानुसार प्रिंट काढता येते. तसेच प्रोफाईलमध्ये दुसरे पान **हे कोरे पान (बारकोड असलेले)** आहे. या को-या पानाच्या आपल्याला आवश्यक तेवढ्या पानांची (गरजेनुसार) प्रिंट काढावी. आपल्या लॉगीन मध्येच गृहपाठाकरिता (Home Assignment) विषयवार प्रश्नदेखील उपलब्ध करून देण्यात

आलेले आहेत. त्याचा उपयोग करून गृहपाठ (Home Assignment) लिहिण्यात यावेत. गृहपाठ लिहून झाल्यावर त्या-त्या विषयाच्या प्रोफाईल पेजच्या प्रिंटसह पोर्टलला त्याच विषयासमोर अपलोड केले जातील याची विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी. तसे न झाल्यास गुणांकन करता येणार नाही. **विद्यार्थ्यांनी गृहपाठ यशस्वीपणे अपलोड केल्यावर आपल्या लॉगीनला 'Uploaded'असा शेरा आल्याची खात्री करावी.**

तसेच विद्यार्थ्यांनी गृहपाठ अपलोड करतेवेळी ABC ID नमूद करावयाचा आहे. ज्या विद्यार्थ्यांनी ABC ID तयार केलेला नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी Home Assignment पोर्टलवर ABC ID तयार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांनी ABC ID/APAAR ID तयार करण्यासाठी https://shorturl.at/wfjLy या लिंकवर क्लिक करावे.

5. विद्यार्थ्यांनी प्रश्नाचे उत्तर लिहितांना **प्रत्येक प्रश्न स्वतंत्र पानावर लिहावा.** सर्व गृहपाठांची उत्तरे मुद्देसूद आणि कमीत कमी शब्दांतअसावीत. दोन्ही गृहपाठ जास्तीत जास्त 4 ते 5 पानांमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.
6. विद्यार्थ्यांनी प्रश्न सोडवितांना क्रमवारच प्रश्न सोडवावेत. तसेच, एका पानावर एकाच गृहपाठाचे उत्तर येईल अशा बेताने लिखाण करावे. तथापि, एका पानात पुरेसे लिखाण बसत नसल्यासत्या पानावर कृ.मा.प. /P.T.O. असे लिहून पुढील पानावर प्रश्न क्रमांक टाकून (उदा. Q-1 Continued...) पुढे उर्वरित उत्तर लिहावे.
7. विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या गृहपाठाची पीडीएफ तयार करताना ती **चांगल्या प्रतीची, सुस्पष्ट स्कॅन केलेली वाचनीय** असावी. पीडीएफ करताना पानांच्या क्रमानुसार पीडीएफ करावी. ती एकमेकांवर ओव्हरलॅप होणार नाहीत, वेडी वाकडी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. **प्रत्येक पानाची साईज किमान 3MB आणि सर्व पाने मिळून जास्तीत जास्त 20MB पेक्षा अधिकची फाईल नसावी.**

   अशा प्रकारे वरीलप्रमाणे प्रक्रीया ही सर्व विषयांसाठी करण्यात यावी. विषयनिहाय गृहपाठ अपलोड करत असताना क्रमवार पाने अपलोड करावी. (अत्यंत महत्त्वाचे - **विद्यार्थ्यांनी गृहपाठ लिहण्यासाठी केवळ आणि केवळ आपल्याच लॉगीन नंतर उपलब्ध असलेल्या पानांचाच वापर करावा. त्यावर बारकोड प्रिंट केलेले असल्यामुळे अन्य कोणत्याही पानांचा वापर करू नये.**) अन्य कोणतेही पान वापरल्यास ते विचारात घेतले जाणा नाही आणि त्याचे मूल्यमापन होणार नाही.
8. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमानुसार विहित अभ्यासक्रम/विषयांचेच गृहपाठ सोडवून त्यांची **विषयनिहाय प्रत्येकी एकेक पीडीएफ** फाईल तयार करून ती त्या-त्या विषयाच्या समोरच अपलोड करावी. **यशस्वीपणे गृहपाठ अपलोड केल्यानंतर विद्यार्थ्याना तसा मेल पाठविला जाईल. सर्व विषयांचे गृहपाठ दिलेल्या या (https://asm.ycmou.org.in/SiteContent/frmQpstatus) लिंकवर दिलेल्या मुदतीत अपलोड करावे.**
9. विद्यार्थ्यांनी अपलोड केलेले गृहपाठ योग्य पद्धतीने अपलोड केलेले असल्यास त्याची प्राथमिक तपासणी अभ्यासकेंद्रामार्फत करण्यात येईल. तपासणी झाल्यावर पात्र (Approved) ठरलेल्या गृहपाठांचे गुणदान अभ्यासकेंद्रावरील समंत्रकांमार्फत करण्यात येईल. तथापि, विद्यार्थ्यांनी अपलोड केलेली गृहपाठाची पाने जर अवाचनीय असतील, विषयानुसार अपलोडींग केलेले नसेल, वेडीवाकडी पाने किंवा ब्लर स्कॅनिंग असेल, कोरी पाने असतील तर अशा गृहपाठांचे मूल्यमापन होणार नाही. ते अस्वीकृत(Reject) केले जातील, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. अस्वीकृतीची माहिती विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रोफाईलला पहायला मिळेल.
10. **गृहपाठ यशस्वीपणे अपलोड केल्यावर विद्यार्थ्यांनी वेळोवेळी आपले लॉगीन चेक करून गृहपाठ तपासले गेले आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे. नसल्यास ही बाब केंद्रप्रतिनिधींच्या लक्षात आणून द्यावी.**

❖ **अभ्यासकेंद्रांनी करावयाची कार्यवाही–**

11. अभ्यासकेंद्रांनाही वरील संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी लागणार आहे. त्यानंतर **सर्वप्रथम आपल्या केंद्रावरील समंत्रकांची नोंद सॉफ्टवेअरमध्ये करावी. आपल्या केंद्रावरील सर्व विषयांना समंत्रकांचे मॅपिंग करणे अभ्यासकेंद्रांना बंधनकारक आहे.** अभ्यासकेंद्रांच्या लॉगीनमध्ये किती विद्यार्थ्यांनी गृहपाठ सादर केले आहेत त्याची माहिती त्यांना उपलब्ध असेल.या सांख्यिकी माहितीच्या आधारे अभ्यासकेंद्रांनी वेळोवेळी दूरध्वनी, इमेलद्वारे, व्हॉट्सएप द्वारे आणि संपर्कसत्रांद्वारे गृहपाठ सादर करण्याबबात स्मरण करून द्यावे आणि सर्व विद्यार्थ्यांकडून गृहपाठ सोडवून घेण्याबाबत पाठपुरावा करावा. मुदतीच्या आत आपल्या केंद्रावरील सर्व विद्यार्थ्यांकडून गृहपाठ सोडवून ते अपलोड करून घ्यावेत. त्यांना योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य करावे. जेणे करून विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतर्गत मूल्यमापनाच्या गुणांचा लाभ मिळू शकेल. **आपल्या केंद्रावरील 100 टक्के विद्यार्थ्यांचे गृहपाठ अपलोड होतील यासाठी आपण प्रयत्नशील रहावे. अन्यथा दंडात्मक कार्यवाहीस केंद्रे पात्र ठरतील**
12. अशा प्रकारे अभ्यासकेंद्राच्या लॉगीनला गृहपाठ आल्यानंतर त्यांनी त्यांची प्राथमिक तपासणी (Approval) तातडीने करावी. त्यापैकी योग्य प्रकारे अपलोड न केलेले गृहपाठ अस्विकृत (Reject) करून. उर्वरित योग्य गृहपाठआपल्या

अभ्यासकेंद्रावरील त्या-त्या विषयांच्या समंत्रकांना तपासण्यासाठी एलॉट करावेत. अभ्यासकेंद्रांनी ही तपासणी प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करून घ्यावयाची आहे.

13. अभ्यासकेंद्रांनी व्हेरिफिकेशन प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय समंत्रकांना गृहपाठ तपासणीसाठी उपलब्ध होणार नाहीत याची सर्व अभ्यासकेंद्रांनी नोंद घ्यावी.

❖ **समंत्रक / परीक्षकांनी करावयाची कार्यवाही –**

14. आपल्या लॉगीनला आलेल्या स्क्रिप्ट्स तातडीने तपासणी पूर्ण करून गुणांकन करावे. अवाचनीय / विषयाशी संबंधित नसलेल्या स्क्रिप्ट्स तातडीने रिजेक्ट करून त्याबाबत अभ्यासकेंद्र प्रतिनिधींना अवगत करावे. आपल्या लॉगीनमधील सर्व स्क्रिप्ट्स मुदतीच्या आतच तपासल्या जातील याची दक्षता प्रत्येक समंत्रकाने घ्यावी.

15. कोणत्याही कारणास्तव अस्वीकृत (Reject) झालेले गृहपाठ विद्यार्थ्यांच्या लॉग-ईनला पुन्हा रि-सबमिशनसाठी उपलब्ध होतील. रि-सबमिशनदेखील हे देखील विहित कालावधीतच पूर्णकरावे लागेल. अन्यथा गृहपाठ तपासला जाणार नाही व त्याचे गुणांकन होणार नाहीआणित्यामुळे आपल्या गुणपत्रिकेतील अंतर्गत गुण (CA) रकाना Absent (Ab) दिसेल याची नोंद घ्यावी. **विद्यार्थ्यांनी याबाबत निष्काळजीपणा केल्यास त्यासाठीच्या परिणांमांना तेच जबाबदार राहतील याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे.**

16. **विद्यार्थ्यांची पोर्टलवर नोंदणी, गृहपाठ अपलोड करण्यापासून ते गृहपाठ तपासणी पर्यंतचे सर्व अपडेट्स (**गृहपाठ स्वीकारले/Verifiedआहेत किंवा अस्वीकृत (Reject)केले आहेत) हे **विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रोफाईलला तसेच त्यांच्या इमेलवर मिळणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल तसेच, इमेल्स वेळोवेळी तपासणे अत्यंत आवश्यक आहे.** तसेच विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्राशी सतत संपर्कात राहणे अपेक्षित आहे.

विद्यार्थी आणि अभ्यासकेंद्रे यांना तांत्रिक अडचण उद्भवल्यास अथवा इतर तत्सम अधिक माहितीसाठी विद्यापीठाने तयार केलेल्या सॉफ्टवेअर कंपनीच्या प्रतिनिधींशी 8071188789, 8007253044, 8055253072 या भ्रमणध्वनीवर संपर्क **oasishelpdesk22@gmail.com** या ईमेलवर आपल्या शंका विचारू शकता.

वरील सर्व सूचनांचे काटेकोर पालन करून आपले गृहपाठ (Home Assignment) पूर्ण करण्यासाठी आपणास शुभेच्छा!

(भटूप्रसाद पाटील)
परीक्षा नियंत्रक

उचित कार्यवाहीसाठी –

2. **सर्व विभागीय केंद्रे -अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड**
   (आपल्या विभागीय केंद्राच्या अधिनस्त असलेल्या अभ्यासकेंद्रांना सूचित करून त्यांच्याद्वारे प्रवेशार्थी विद्यार्थ्यांपर्यंत वरीलप्रमाणे सूचनापत्रक पाठवावे आणि ऑनलाईन गृहपाठ पद्धतीबाबत अवगत करावे.
   टीप – वरील सूचनापत्रकातील सर्व माहिती अभ्यासकेंद्र, विभागीय केंद्र यांनी विद्यार्थ्यांच्या वेळोवेळी निदर्शनास आणून द्यावी. याबाबत स्वतंत्रपणे विद्यार्थ्यांना कळवले जाणार नाही.
3. उपकुलसचिव, परीक्षा कक्ष- 1,2,3

प्रत माहितीसाठी -

1. मा.कुलगुरू कार्यालय
2. मा.प्र-कुलगुरू कार्यालय
3. मा. संचालक, सर्व विद्याशाखा